म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकासासंदर्भात म्हाडा प्राधिकरणाकडून मंजूर करण्यांत येत असलेल्या प्रो-राटा चटईक्षेत्र निर्देशांकाच्या वाटपासंदर्भात.

84
2015
MS/MSA/22

महाराष्ट्र शासन
गृहनिर्माण विभाग
**शासन निर्णय क्रमांक:- प्रो-राटा २०१५/प्र.क.३३९/गृनिप**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई:- ४०० ०३२
दिनांक:- ३ डिसेंबर, २०१५

**प्रस्तावना:-**

म्हाडाच्या मुंबई शहर व मुंबई उपनगरामधील वसाहतींचा पुनर्विकास बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीच्या विनियम ३३(५) अन्वये करण्यात येतो. सदर वसाहतींचा पुनर्विकास करतांना म्हाडाकडून मंजूर करण्यांत येत असलेल्या प्रो-राटा चटईक्षेत्र निर्देशांकाच्या वाटपासंदर्भात प्रचलित धोरणांचा अभ्यास करुन त्याबाबत अहवाल सादर करण्यासाठी अपर मुख्य सचिव, परिवहन यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्याचे आदेश मा. मंत्री, गृहनिर्माण यांनी दिले आहेत. सदर आदेशास अनुसरुन पुढीलप्रमाणे समिती गठीत करण्याबाबतचा निर्णय घेण्यांत येत आहे:-

**शासन निर्णय:-**

म्हाडाच्या मुंबई शहर व मुंबई उपनगरातील वसाहतींचा पुनर्विकास करतांना म्हाडाकडून मंजूर करण्यांत येत असलेल्या प्रो-राटा चटईक्षेत्र निर्देशांकाच्या वाटपासंदर्भात शिफारशी करण्यासाठी पुढीलप्रमाणे समितीचे गठन करण्यात येत आहे:-

| | |
|---|---|
| १) श्री. गौतम चॅटर्जी, अपर मुख्य सचिव, परिवहन | अध्यक्ष |
| २) श्री. श्रीकांत सिंह, प्रधान सचिव, गृहनिर्माण | सदस्य |
| ३) डॉ. नितिन करीर, प्रधान सचिव, नगरविकास | सदस्य |
| ४) श्री. संभाजी झेंडे, उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा | सदस्य |

**समितीची कार्यकक्षा:-** म्हाडा इमारतींच्या पुनर्विकासासंदर्भात प्राधिकरणांकडून मंजूर करण्यांत येत असलेल्या प्रो-राटा चटईक्षेत्र निर्देशांकाच्या वाटपासंदर्भात प्रचलित धोरणाचा अभ्यास करुन अहवाल/शिफारशी शासनास सादर करणे.

वरील समितीने आपला अहवाल आठ दिवसांत शासनास सादर करावयाचा आहे.



सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यांत आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१५१२०४१८१८०६९६०९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यांत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

M R Parkar

Digitally signed by M R Parkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=M R Parkar
Date: 2015.12.04 18:14:43 +05'30'

( म. रा. पारकर )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत:-**

१) मा. सभापती, विधानपरिषद/मा. अध्यक्ष, विधानसभा